सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन

विधि व न्याय विभाग

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७

( दिनांक ३१ जानेवारी २००६ पर्यंत सुधारित )

## Maharashtra Act No. 38 of 1997

# Maharashtra State Board of Technical Education Act , 1997

( *As modified upto 31st January 2006.* )

व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई यांच्याद्वारे भारतात मुद्रित आणि
संचालक, शासन मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई ४०० ००४ यांच्याद्वारे प्रकाशित.

२००६

[ किंमत : रु. १३-०० ]

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

# अधिनियम, १९९७

---

## अनुक्रमणिका


पृष्ठ क्रमांक

उद्देशिका.

कलमे.

प्रकरण एक

**प्रारंभिक.**

| | | |
|---|---|---|
| १. | संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. | १ |
| २. | व्याख्या. | १ |

प्रकरण दोन

**[नियामक परिषदेची आणि] मंडळाची स्थापना आणि रचना.**

| | | |
|---|---|---|
| ३. | मंडळाची स्थापना. | २ |
| ४. | मंडळ कायद्याने संस्थापित. | २ |
| ५. | मंडळाची रचना करणे. | २ |
| ६. | संचालकांची नियुक्ती व पदावधी आणि सेवेच्या शर्ती. | ४ |
| ७. | मंडळाच्या सदस्यांचा पदावधी व त्यांचे भत्ते | ४ |
| ७क. | नियामक परिषदेची स्थापना. | ४ |
| ८. | मंडळाचा अध्यक्ष व सदस्य यांची निरर्हता. | ५ |
| ९. | नैमित्तिक रिक्त पदे. | ६ |
| १०. | सदस्याचा राजीनामा. | ६ |
| ११. | सदस्यास काढून टाकणे. | ६ |
| १२. | मंडळाच्या बैठका. | ६ |
| १३. | अपात्र ठरवल्यामुळे अध्यक्षाचे किंवा सदस्याचे पद रिक्त होणे. | ७ |
| १४ | परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यामुळे सदस्याचे पद रिक्त होणे. | ७ |
| १५. | रिक्त पदाबाबतच्या प्रश्नाचा निर्णय. | ७ |
| १६. | रिक्त पदांमुळे किंवा रचनेतील दोषांमुळे कृती किंवा कामकाज विधिअग्राह्य न होणे. | ७ |
| १७. | तज्ज्ञांना आणि अधिकाऱ्यांना बैठकीस बोलविण्याचा अधिकार. | ७ |
| १८. | समित्यांची रचना. | ७ |

१९. मंडळाने विवक्षित कर्मचारीवर्ग सामावून घेणे व हा अधिनियम लागू असेल अशा गोष्टीसंबंधीची शासनाची दायित्वे हाती घेणे, स्वीकारणे व पत्करणे. . . . . . . . . ८

२०. सचिव, सहसचिव आणि उपसचिव, सहायक सचिव, परीक्षा नियंत्रक, पद्धती विश्लेषक, वित्त अधिकारी व लेखा अधिकारी यांची नेमणूक, अधिकार व कर्तव्ये. . . . . . . ९

२१. मंडळाचे इतर अधिकारी व कर्मचारी.

प्रकरण तीन

**[नियामक परिषदेचे व मंडळाचे] अधिकार व कर्तव्ये.**

२१क. नियामक परिषदेचे अधिकार व कर्तव्ये. . . . . . . ९

२२. मंडळाचे अधिकार व कर्तव्ये. . . . . . . १०

२३. मंडळाच्या संचालकांचे अधिकार आणि कर्तव्ये. . . . . १३

२४. निदेश काढण्याचे शासनाचे अधिकार. . . . . . . १३

प्रकरण चार

**परवानगी, संलग्नीकरण, स्वायत्त दर्जा व सममूल्यता प्रदान करणे.**

२५. संलग्नी करणाच्या शर्ती. . . . . . . १४

२६. परवानगी संबंधीची कार्यपद्धती. . . . . . . १५

२७. संलग्नीकरण कार्यपद्धती. . . . . . . १५

२८. संलग्नीकरण चालू ठेवणे. . . . . . . १६

२९. संलग्नीकरणाच्या व्याप्तीमध्ये वाढ करणे. . . . . १६

३०. स्थायी संलग्नीकरण व मान्यता. . . . . . . १६

३१. संस्थांची तपासणी व अहवाल. . . . . . . १६

३२. संलग्नीकरण किंवा मान्यता काढून घेणे. . . . . १६

३३. स्वायत्त दर्जा प्रदान करणे. . . . . . . १७

३४. सममूल्यता आणि पात्रता. . . . . . . १८

३५. संस्था बंद करणे. . . . . . . १८

प्रकरण पाच

**निधी, वित्तव्यवस्था, लेखा व लेखापरीक्षा.**

३६. मंडळाच्या मतांचा वापर. . . . . . . १९

३७. मंडळाचा निधी, त्याची अभिरक्षा व त्याची गुंतवणूक. . . . . १९

३८. निधीचा सर्वसाधारण वापर. . . . . . . २०

३९. निधीतून रक्कम काढण्याची रीत. . . . . . . २०

४०. प्रादेशिक कार्यालयांना नियतवाटप. . . . . . . २०

४१. वार्षिक अर्थसंकल्प तयार करणे. . . . . . . २०

४२. वार्षिक लेखे व लेखापरीक्षण. . . . . . . २०

४३. निरीक्षण व चौकशी. .. .. .. २०
४४. मंडळाने पुरवावयाची माहिती, विवरणपत्रे इत्यादी. .. .. २१

प्रकरण सहा

**अनुपूरक आणि संकीर्ण तरतुदी.**

४५. समितीकडे सोपवलेल्या अधिकारांचा वापर करण्याची रीत. .. २१
४६. विनियम करण्याचा मंडळाचा अधिकार. .. .. २१
४७. पहिले विनियम. .. .. .. .. २२
४८. उप विधी करण्याचा मंडळाचा अधिकार. .. .. २२
४९. शंका उपस्थित झाल्याच्या बाबतीत अर्थउकल. .. .. २३
५०. तंत्रनिकेतन व पदविका स्तरावरील संस्था यांची कर्तव्ये व त्यांचे सहाय्य. .. २३
५१. सद्भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण.. .. .. २३
५२. मंडळाचे सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी लोकसेवक असणे. .. २३
५३. व्यावृत्ती. .. .. .. .. २३
५४. अडचणींचे दूर करण्याचा अधिकार. .. .. २४

---

## सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८.[१]

## [१] महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७

(राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर " **महाराष्ट्र शासन राजपत्रात** " भाग चार, असाधारण, दिनांक ६ ऑगस्ट १९९७ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

२००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या (२७-११-२००२)†

**महाराष्ट्र राज्यामधील पदविका स्तरावरील तंत्र शिक्षणाशी संबंधित बाबींचे नियमन करण्याकरिता राज्य मंडळाची स्थापना करण्याची तरतूद करण्यासाठी अधिनियम.**

**ज्याअर्थी,** महाराष्ट्र राज्यामधील पदविका स्तरावरील तंत्र शिक्षणाशी संबंधित बाबींचे नियमन करण्याकरिता राज्य मंडळाची स्थापना करण्यासाठी आणि यात यापुढे दिलेल्या त्यांच्याशी संबंधित इतर बाबींची तरतूद करणे इष्ट आहे ;

त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या अठ्ठेचाळिसाव्या वर्षी याद्वारे, पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—

### प्रकरण एक

### प्रारंभिक.

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ अधिनियम, १९९७ असे म्हणावे. संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू होईल.

(३) हे कलम, ताबडतोब अंमलात येईल आणि या अधिनियमातील उर्वरित तरतुदी, राज्य शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे नेमून देईल अशा दिनांकास अंमलात येतील.

**२.** या अधिनियमात, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,— व्याख्या.

(क) " नेमून दिलेला दिवस " याचा अर्थ, कलम १ च्या पोट-कलम (३) अन्वये या अधिनियमाच्या कलम १ व्यतिरिक्त उर्वरित तरतुदी ज्या दिनांकास अंमलात येतील तो दिनांक, असा आहे ;

(ख) " मंडळ " याचा अर्थ, कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, असा आहे ;

(ग) " उपविधी " याचा अर्थ, कलम ४८ अन्वये मंडळाने तयार केलेले उपविधी, असा आहे ;

(घ) " पदविका स्तरावरील तंत्र शिक्षण " याचा अर्थ, पदविका किंवा पदविकेत्तर किंवा पदव्युत्तर पदविका किंवा प्रगत पदविका स्तरावरील अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्र किंवा व्यवस्थापन शिक्षण आणि मंडळाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेले इतर शिक्षण संपादन करण्यासाठी, यथास्थिति, माध्यमिक, उच्च माध्यमिक, अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्र पदविका यांच्यानंतरचे असेल असे तंत्र अभियांत्रिकी शिक्षण किंवा मंडळाने विनिर्दिष्ट केलेले कोणतेही अन्य शिक्षण, असा आहे ;

---

[१] उद्देश व कारणे यांचे निवेदन यासाठी **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण, भाग पाच, पृष्ठ ४७८ पहा.

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक दर्शविते.

१ एप्रिल १९९९, पहा जी. एन. एच. आणि टी. ई. डी. क्र. ईएक्सएम-२५९६/२१४८ (३-९६) टीई-२ दिनांक ३० मार्च १९९९.

[१][(घ-क) " संचालक " याचा अर्थ, कलम ६(१) अन्वये नियुक्त केलेला महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाचा संचालक असा आहे ;

(ङ) " परीक्षा " याचा अर्थ, मंडळाकडून घेतली जाणारी किंवा घेतल्या जाणाऱ्या एक किंवा अधिक परीक्षा असा आहे ;

(च) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

[२][(च क) " नियामक परिषद " याचा अर्थ, कलम ७क अन्वये स्थापन झालेली महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाची नियामक परिषद, असा आहे ;]

(छ) " संस्थेचा प्रमुख " किंवा " प्राचार्य " याचा अर्थ, राज्य मंडळाने मान्यता दिलेल्या तंत्रनिकेतनाच्या किंवा पदविका स्तरावरील संस्थेच्या अध्यापक वर्गाचा कोणत्याही प्रकारे पदनिर्देशित केलेला प्रमुख ;

(ज) " तंत्रनिकेतन किंवा संस्था" याचा अर्थ, अभियांत्रिकी किंवा तंत्रशास्त्र किंवा व्यवस्थापन शिक्षण यातील या अधिनियमाखाली मंडळाने मान्यता दिलेली, पदविका किंवा पदविकोत्तर किंवा पदव्युत्तर पदविका किंवा प्रगत पदविका यांचे शिक्षण देणारी संस्था असा आहे ;

(झ) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या विनियमांद्वारे विहित केलेले असा आहे ;

(ञ) " प्रदेश " याचा अर्थ, या अधिनियमाच्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे तीन प्रदेशांतील प्रत्येक प्रदेशात समाविष्ट असणारे क्षेत्र असा आहे ;

(ट) " विनियम " याचा अर्थ, शासनाने कलम ४७ खाली केलेले आणि मंडळाने कलम ४६ खाली केलेले विनियम असा आहे ;

(ठ) " शिक्षक " याचा अर्थ, मंडळाने मान्यता दिलेल्या पदविका स्तरावरील संस्थेचा प्राचार्य किंवा संस्था प्रमुख यांच्या व्यतिरिक्त, शिक्षक वर्गातील व्यक्ती असा आहे.

## प्रकरण दोन

## [३][नियामक परिषदेची आणि] मंडळाची स्थापना आणि रचना.

मंडळाची स्थापना.

**३.** शासन, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ या नावाने एक मंडळ स्थापन करील.

मंडळ कायद्याने संस्थापित.

**४.** कलम ३ अन्वये स्थापन करण्यात आलेले मंडळ हे, वर नमूद केलेल्या नावाचा निगम निकाय असेल आणि त्याची अखंड परंपरा असेल व त्याचा एक सामाईक शिक्का असेल आणि त्यास करार करण्याचा, मालमत्ता संपादन करण्याचा, धारण करण्याचा व ती निकालात काढण्याचा, आणि या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करण्याचा अधिकार असेल आणि त्याच्या निगम नावाने त्यास दावा करता येईल व त्याच्यावर दावा लावता येईल.

मंडळाची रचना करणे.

[४][**५.** (१) मंडळ पुढील सदस्यांचे मिळून बनलेले असेल :—

(क) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य हे अध्यक्ष असतील ;

(ख) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, सदस्य सचिव ; आणि

(ग) पुढील सदस्य म्हणजे :—

---

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, याच्या कलम २ (अ) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाचे कलम २ (अ) हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील आधिनियमाच्या कलम ३ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम ४ द्वारे हे कलम समाविष्ट करण्यात आले.

### वर्ग अ—पदसिद्ध सदस्य

(एक) महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचा अध्यक्ष किंवा विभागीय मंडळाच्या अध्यक्षाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी, त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती ;

(दोन) उद्योग संचालक, महाराष्ट्र राज्य किंवा सह संचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी, त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती ;

(तीन) राष्ट्रीय तांत्रिक मनुष्यबळ माहिती यंत्रणेच्या राज्य मध्यवर्ती (नोडल) केंद्राचा एक प्रतिनिधी ;

(चार) अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषद, (पश्चिम प्रदेश) नवी दिल्ली याचा प्रादेशिक अधिकारी ;

(पाच) संचालक, शिकाऊ उमेदवारी प्रशिक्षण मंडळ (पश्चिम विभाग), भारत सरकार, मनुष्यबळ विकास मंत्रालय ;

(सहा) शासनाचा सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग किंवा उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसेल अशी त्याने नामनिर्देशित केलेली व्यक्ती.

### वर्ग ब—नामनिर्देशित सदस्य

(एक) शासनाने नामनिर्देशित करावयाचा, राज्यातील शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयांचा एक ज्येष्ठतम प्राचार्य ;

(दोन) शासकीय किंवा अनुदानित आणि विना अनुदानित तंत्रनिकेतनांतून प्रत्येकी एक याप्रमाणे, संस्थाचे प्राचार्य व प्रमुख यांच्यामधून शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य-यापैकी किमान एक सदस्य महिला असेल ;

(तीन) शासकीय किंवा अनुदानित आणि विना अनुदानित तंत्रनिकेतनांमधील शिक्षकांमधून प्रत्येकी एक याप्रमाणे शासनाने नामनिर्देशित करावयाचे दोन सदस्य-यापैकी किमान एक सदस्य मागासवर्ग समाजातील असेल ;

(चार) प्रत्येक महसूल प्रदेशातून आळीपाळीने एक याप्रमाणे, व्यावसायिक संस्थांमधून शासनाने नामनिर्देशित करावयाचे तीन सदस्य ;

(पाच) लघु उद्योग, माहिती तंत्रज्ञान, जैवतंत्रज्ञान, मौल्यवान खडे व जडजवाहीर, औषधनिर्माणशाळा आणि हॉटेल व्यवस्थापन या क्षेत्रांतील उद्योजक असलेले उद्योग संघातून शासनाने नामनिर्देशित करावयाचे सहा सदस्य-यापैकी किमान दोन सदस्य मुंबई व पुणे प्रदेशाबाहेरील असतील ;

परंतु एखाद्या व्यक्तीची अशाप्रकारे नियुक्ती ही, ज्याच्या आधारे झाली असेल ते पद, पदनाम किंवा यथास्थिति हुद्दा धारण करण्याचे बंद होताच ती व्यक्ती मंडळाचा सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल आणि अशी व्यक्ती, तेव्हांपासून एका आठवड्याच्या आत आपण मंडळाचा सदस्य असणे बंद झाल्याचे अध्यक्षाला लेखी कळवील.

२००३ चा महा. १. (२) मंडळाचे सदस्य म्हणून वेळोवेळी नामनिर्देशित केलेल्या, पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त अन्य व्यक्तींची नावे शासनाकडून राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील.

(३) महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ (सुधारणा) अधिनियम, २००२, प्रसिद्ध झाल्यावर, मंडळाच्या विद्यमान सदस्यांनी उक्त दिनांकास आपली पदे रिक्त केल्याचे मानण्यात येईल.]

संचालकांची नियुक्ती व पदावधी आणि सेवेच्या शर्ती.

[१][**६.** (१) मंडळाचा एक संचालक असेल ; त्याची नियुक्ती, शासन, सहसंचालक किंवा त्याच्याशी समतुल्य पदाचा, दोन वर्षापेक्षा कमी नसेल एवढा किमान अनुभव असलेला शासनाच्या तंत्र शिक्षण सहसंचालकांमधून करील.

(२) संचालक, त्याचे नाव **राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या मुदतीसाठी पद धारण करील.

(३) पोट-कलम (२) मधील कोणत्याही गोष्टींमुळे, लोकसेवेच्या निकडीच्या वेळी, संचालकांची, अशा पदावधीत शासनाच्या अधीन इतर कोणत्याही पदावर बदली करण्याच्या शासनाच्या अधिकारास बाध येणार नाही ; आणि जर, संचालक शासनाच्या सेवेतून वयनिवृत्त झाला असेल तर-मात्र त्याची सेवा वाढविण्यात आली असेल किंवा त्याची शासनाच्या सेवेत फेरनेमणूक करण्यात आली असेल आणि त्याची इतर एखाद्या पदावर बदली करण्यात आली नसेल तर ती गोष्ट वगळून एरवी-तो संचालक असण्याचे बंद होईल.

(४) शासनाच्या, मंडळाच्या संचालकाचा पदावधी वेळोवेळी वाढवता येईल, तथापि असा एकूण कालावधी दहा वर्षांहून अधिक असणार नाही.

(५) संचालक हा शासनाच्या तंत्र शिक्षणाच्या सह संचालकाच्या दर्जाच्या समतूल्य दर्जाचा शासनाचा कर्मचारी असेल आणि संचालकाच्या सेवेच्या इतर शर्ती या, शासन निर्धारित करील त्याप्रमाणे असतील.

(६) संचालकाचे पद, रजा, आजारपण किंवा इतर कारणामुळे तात्पुरते रिक्त होईल, अशा बाबतीत शासनाला दुसऱ्या व्यक्तीची संचालक म्हणून नेमणूक करता येईल.

मंडळाच्या सदस्यांचा पदावधी व त्यांचे भत्ते.

**७.** (१) मंडळाच्या पदसिद्ध सदस्यांव्यतिरिक्त अन्य सदस्य हे, ज्या दिनांकास त्याची नावे **राजपत्रात** प्रसिद्ध होतील त्या दिनांकापासून [२][पाच वर्षांच्या] अवधीसाठी पद धारण करतील.

(२) मावळत्या सदस्याचा पदावधी हा, त्याच्या उत्तराधिकाऱ्यांची नावे ज्या दिनांकास **राजपत्रात** प्रसद्धि करण्यात येतील त्या दिनांकाच्या निकटपूर्वीच्या दिनांकापर्यंत चालू राहील व त्या दिनांकास संपेल.

(३) सदस्य मंडळाच्या विनियमांद्वारे निर्धारित करण्यात येईल असा पूरक भत्ता मिळण्यास हक्कदार असतील.

नियमिक परिषदेची स्थापना.

[३][" **७क** (१) शासन, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पदविका पातळीवरील तंत्र शिक्षण आणि राज्य स्तरावरील परीक्षा यांच्याशी संबंधीत बाबीचे नियंत्रण आणि संनियंत्रण करणारे शिखर मंडळ असलेल्या नियामक परिषदेची स्थापना करील.

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १ च्या कलम ५ द्वारे हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. १ च्या कलम ६ अन्वये " चार वर्षे " या मजकुराएवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(२) नियामक परिषद पुढील व्यक्तींची मिळून बनलेली असेल :—

| | | |
|---|---|---|
| (एक) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री, महाराष्ट्र राज्य | . . | अध्यक्ष ; |
| (दोन) उच्च व तंत्र शिक्षण राज्यमंत्री | . . . . | उपाध्यक्ष ; |
| (तीन) सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग किंवा त्याने नामनिर्देशित केलेली उप सचिवाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाची नसलेली व्यक्ती. | . . | सदस्य ; |
| (चार) शासनाने नामनिर्देशित केलेले तीन उद्योजक | . . | सदस्य ; |
| (पाच) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य | . . | सदस्य ; |
| (सहा) सचिव, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ | . . | सदस्य ; |
| (सात) संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ | . . | पदसिद्ध सदस्य-सचिव. |

(३) नियामक परिषदेचे पदसिद्ध सदस्य वगळता, वेळोवेळी नामनिर्देशित करण्यात आलेल्या व्यक्तींची सदस्य म्हणून नावे शासनाकडून **राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

(४) नियामक परिषदेच्या नामनिर्देशित सदस्याचा पदावधी हा, राज्य शासनाकडून त्यांना त्यापूर्वीच पदावरून काढून टाकले नसेल तर, पाच वर्षांचा असेल.

(५) नियामक परिषद, प्रत्येक वर्षाला दोनपेक्षा कमी नसतील, इतक्या बैठकी घेईल आणि दोन लागोपाठच्या बैठकींमध्ये सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधी असणार नाही.

(६) नामनिर्देशित सदस्यांना बैठकींना उपस्थित राहण्याकरिता किंवा सदस्य म्हणून कोणतीही कामे पार पाडण्याकरिता येणाऱ्या वैयक्तिक खर्चाची पूर्तता करण्याकरिता शासन निश्चित करील असे भत्ते मिळतील.

**८.** एखादी व्यक्ती ही, पुढील बाबतीत मंडळाचा किंवा या अधिनियमाखाली नेमण्यात आलेल्या कोणत्याही समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून नेमली जाण्यास, किंवा नामनिर्देशित केली जाण्यास किंवा असा अध्यक्ष किंवा सदस्य म्हणून चालू राहण्यास अपात्र ठरेल,— मंडळाचा अध्यक्ष व सदस्य यांची निरर्हता.

(क) जर मंडळाच्या आदेशावरून केलेल्या कोणत्याही कामात किंवा मंडळाच्यावतीने केलेल्या कोणत्याही संविदेत तिचा स्वतःचा किंवा तिच्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल तर ;

(ख) जर कलम ११ अन्वये जिला पदावरून काढून टाकण्याचा आदेश देण्यात आला आहे, अशी ती व्याक्ती असेल तर :

परंतु, ज्या व्यक्तीविरुद्ध असा आदेश देण्यात आला असेल ती व्याक्ती, तिला पदावरून काढून टाकण्यात आल्याच्या दिनांकापासून पाच वर्षांचा किंवा शासन विनिर्दिष्ट करील असा त्याहून कमी कालावधी लोटलेला असेल तर,- या खंडाअन्वये अपात्र असल्याचे मानण्यात येणार नाही.

नैमित्तिक रिक्त पदे.

९. [१][नियामक परिषद्] किंवा मंडळाच्या किंवा मंडळाने रचना केलेल्या कोणत्याही समितीच्या सदस्यांची सर्व नैमित्तिक रिक्त पदे यथास्थिति, नामनिर्देशनाद्वारे किंवा नेमणुकीद्वारे लवकरात लवकर भरण्यात येतील ; आणि त्या नैमित्तिक रिक्त पदावर नामनिर्देशन किंवा नेमणूक केलेली व्यक्ती, ज्या सदस्याच्या जागी तिचे नामनिर्देशन कि[illegible] [illegible]णूक केली असेल त्या सदस्याचे पद रिक्त झाले नसते तर, त्याने जोपर्यंत असे [illegible] [illegible] तोपर्यंत पद धारण करील.

सदस्याचा राजीनामा.

१०. मंडळाचा [२][नियामक परिषदेचा] पदसि[illegible]
[३][यथास्थिति, नियामक परिषदेच्या] अध्यक्षाक[illegible]
परिषदेच्या अध्यक्षास देऊन कोणत्याही [illegible]
असा राजीनामा [४][मंडळाच्या अध्यक्ष[illegible]
मिळाल्यावर लगेच अशा सद[illegible]

सदस्य काढून टाकणे

११. (१) शासनास
कोणतीही चौकशी [illegible]
कोणत्याही सद[illegible]

(क) [illegible]

भारतातील [illegible]

(ख) [illegible]

(ग) शास[illegible]

विकलांग म्हणून [illegible]

(घ) तो विकल[illegible]

असेल ; किंवा

(ङ) मंडळाच्या ध्येयांना व उ[illegible]

परंतु, अशी शिफारस का करण्यात येऊ [illegible]
याचे कारण दर्शवण्याची वाजवी संधी त्याला दिल्याखेर[illegible]
करणार नाही किंवा खंड (ङ) अन्वये कोणताही आदेश क[illegible]

(२) शासनाला, त्याच्या मते मंडळाच्या नामनिर्देशित केलेल्या [illegible]
ज्या कोणत्याही सदस्याच्या हालचाली मंडळाचे किंवा समितीचे कार्य सुर[illegible]
हानिकारक असतील किंवा त्यात अडथळा करत असतील तर, त्या सदस्यास, [illegible]
स्वत: होऊन काढून टाकता येईल :

परंतु, कोणत्याही सदस्याला त्याच्याविरुद्ध असा आदेश का काढण्यात येऊ नये याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज पदावरून काढून टाकण्यात येणार नाही.

(३) पोट-कलम (१) आणि (२) यात काहीही अंतर्भूत असले तरी, मंडळाचा नामनिर्देशित सदस्य हा, शासनाची मर्जी असेपर्यंत पद धारण करील व शासनास योग्य वाटेल अशा कोणत्याही वेळी त्यास पदावरून दूर करता येईल.

मंडळाच्या बैठका.

१२. (१) मंडळाच्या वर्षातून निदान दोन वेळा तरी बैठका होतील आणि लागोपाठच्या दोन बैठकांच्या दरम्यान सहा महिन्यांचे अंतर पडणार नाही.

---

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, यांच्या कलम ८ द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[२] वरील अधिनियमाच्या कलम ९ (क) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[३] वरील अधिनियमाच्या कलम ९ (ख) द्वारे हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[४] वरील अधिनियमाच्या कलम ९ (ग) द्वारे अध्यक्ष या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) मंडळाच्या अध्यक्षास, निकडीच्या कारणामुळे तशी आवश्यकता असल्यास कोणत्याही वेळी मंडळाची विशेष बैठक बोलावता येईल आणि मंडळाच्या एकूण सदस्यांपैकी एक-तृतीयांशाहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी लेखी विनंती केली असता, अध्यक्ष, त्यास अशी विनंती मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांपेक्षा नंतरचा नसेल अशा दिनांकास मंडळाची विशेष बैठक बोलावील.

**१३.** मंडळाच्या किंवा कोणत्याही समितीचा अध्यक्ष किंवा सदस्य हा, कलम ८ मध्ये नमूद केलेल्या कारणापैकी कोणत्याही कारणाने अपात्र ठरला असल्यास, त्याचे पद रिक्त झाल्याचे शासन जाहीर करील. *अपात्र ठरविल्यामुळे अध्यक्षाचे किंवा सदस्याचे पद रिक्त होणे.*

**१४.** मंडळावरील नामनिर्देशित किंवा पदनिर्देशित सदस्य, मंडळाच्या परवानगीशिवाय, मंडळाच्या लागोपाठ तीन बैठकींना अनुपस्थित राहिला तर, त्यानंतर त्यांचे पद रिक्त होईल आणि तसे अध्यक्ष जाहीर करील. *परवानगीशिवाय अनुपस्थित राहिल्यामुळे सदस्याचे पद रिक्त होणे.*

**१५.** अध्यक्षाचे किंवा सदस्याचे पद, कलम १३ किंवा १४ अन्वये रिक्त झाले आहे किंवा कसे याविषयी कोणताही विवाद उद्‌भवल्यास, तो विवाद शासनाकडे निर्णयासाठी पाठविण्यात येईल व त्या बाबत त्याचा निर्णय अंतिम असेल. *रिक्त पदाबाबतच्या प्रश्नाचा निर्णय.*

**१६.** मंडळाची किंवा कोणत्याही समितीची कोणतीही कृती किंवा कामकाज हे, अशा मंडळामध्ये किंवा समितीत कोणतेही पद रिक्त होते किंवा अशा मंडळाच्या किंवा समितीच्या रचनेत दोष होता केवळ याच कारणावरून विधिअग्राह्य ठरणार नाही. *रिक्त पदांमुळे किंवा रचनेतील दोषांमुळे कृती किंवा कामकाज विधिअग्राह्य न होणे.*

**१७.** मंडळास, त्याच्या मते जी व्यक्ती शिक्षण क्षेत्रातील तज्ञ असेल अशा कोणत्याही व्यक्तीस किंवा शासनाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास, ती तज्ञ व्यक्ती किंवा तो अधिकारी ज्या विषयाशी संबंधीत असेल तो विषय जर मंडळाच्या किंवा त्याच्या समितीच्या बैठकीमध्ये चर्चेसाठी किंवा विचारार्थ मांडला जाण्याचा संभव असेल तर, त्या सभेकरिता निमंत्रित करता येईल. *तज्ञांना आण अधिकाऱ्यांना बैठकीस बोलवण्याचा अधिकार.*

**१८.** (१) मंडळ, पुढील समित्यांची रचना करील :— *समित्यांची रचना*

(क) विद्वत् समिती ;

(ख) वित्त समिती ;

(ग) पाठ्यक्रम समित्या, या वीसापेक्षा जास्त नसतील ;

(घ) समतुल्यता समिती ;

(ङ) विशेष समिती.

(२) मंडळ, त्यांची कार्ये कार्यक्षमरीत्या पार पाडण्याकरिता त्यास आवश्यक वाटेल, अशा इतर समित्यांची रचना करील.

(३) मंडळाने रचना केलेल्या प्रत्येक समितीच्या सदस्यांची संख्या, त्यांच्या सदस्यांचा पदावधी व अशा समितीने पार पाडावयाची कर्तव्ये व कार्ये विहित करण्यात येतील त्याप्रमाणे असतील.

मंडळाने विवक्षित कर्मचारीवर्ग सामावून घेणे व हा अधिनियम लागू असेल अशा गोष्टींसंबंधीची शासनाची दायित्वे हाती घेणे, स्वीकारणे व पत्करणे.

**१९.** (१) शासन निर्णय, शिक्षण व समाजकल्याण विभाग, क्रमांक एक्सएम-७२६०-के, दिनांक ७ जानेवारी १९६३ याद्वारे रचना करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्याच्या तांत्रिक परीक्षा मंडळाच्या (यात यापुढे ज्याचा निर्देश "विद्यमान मंडळ" असा करण्यात आला आहे) प्रयोजनार्थ सेवारत असलेल्या सचिव, सह-सचिव (तंत्र), उप-सचिव (तंत्र), सहाय्यक सचिव (तंत्र), वित्त अधिकारी, परीक्षा नियंत्रक, लेखा अधिकारी आणि कार्यविश्लेषक यांच्या व्यतिरिक्त, मंडळाच्या स्थापनेच्या दिनांकास असलेल्या विद्यमान कर्मचारी वर्गांपैकी शासन निर्देश देईल अशा कर्मचारीवर्गाचा मंडळ स्वीकार करील आणि त्यांना सेवेत घेईल आणि अशी स्वीकारलेली आणि सेवेत घेतलेली प्रत्येक व्यक्ती ही, या अधिनियमांच्या आणि त्याखाली केल्या विनियमांच्या तरतुदींच्या अधीन असेल.

परंतु,—

(क) मंडळाच्या सेवेत यापुढेही राहण्याचा पर्याय, असे कर्मचारी विहित कालमर्यादेत देतील ;

(ख) अशा नियुक्तीच्या कालावधीत वेतन, रजा, सेवानिवृत्ति, भत्ते, निवृत्तिवेतन, भविष्यनिर्वाह निधी या संबंधीच्या सर्व बाबी आणि उक्त कर्मचारीवर्गातील कर्मचाऱ्यांच्या इतर सेवाविषयक अटी व शर्ती, महाराष्ट्र नागरी सेवा नियम किंवा शासन वेळोवेळी तयार करील असे इतर नियम यांद्वारे विनियमित करण्यात येतील ;

(ग) अशा कोणत्याही कर्मचाऱ्याची सेवा नाकारणे, त्याची बडतर्फी किंवा त्याला सेवेतून काढून टाकणे, द्रव्यदंड किंवा इतर कोणतीही शिक्षा यांविरुद्ध शासनाकडे अपील करण्याचा हक्क असेल.

(२) विद्यमान मंडळाच्या स्थायी कर्मचाऱ्यांनी शासकीय सेवेचा पर्याय स्वीकारला तर, त्यांना, दोन वर्षांच्या मुदतीत, तंत्र शिक्षण संचालनालयाच्या नियंत्रणाखालील कोणत्याही कार्यालयांमध्ये किंवा संस्थेमध्ये जेथे रिक्त पद असेल तेथे सामावून घेण्यात येईल.

(३) विद्यमान मंडळाच्या कोणत्याही प्रयोजनांच्या संबंधात, नेमून दिलेल्या दिवसापूर्वी विद्यमान मंडळाने केला असेल असा सर्व खर्च, त्या दिनांकाला कलम ३७ अन्वये मंडळास शासनाकडून पुरविण्यात आलेले भाडवल खर्चाबाबतची आगाऊ रक्कम असल्याचे मानण्यात येईल आणि अशा खर्चातून संपादित केलेली सर्व मत्ता मंडळाकडे निहित असेल.

(४) सर्व जंगम किंवा स्थावर मालमत्ता आणि सर्व हक्क आणि हितसंबंध-मग ते कोणत्याही स्वरुपाचे असोत, आणि विद्यमान मंडळाचे सर्व अधिकार आणि विशेषाधिकार, मंडळाकडे हस्तांतरित होतील व मंडळाकडे निहित राहतील व ज्या उद्दिष्टांकरिता मंडळ घटीत करण्यात आले आहे, त्यांसाठी त्याचा वापर केला जाईल.

(५) महाराष्ट्र राज्यात तंत्र शिक्षणाला चालना देण्याच्या कोणत्याही योजनेच्या संबंधात, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनांकरिता, मंडळ प्रथमत : स्थापन होण्यापूर्वी शासनाद्वारे किंवा विद्यमान मंडळाद्वारे शासनाशी किंवा विद्यमान मंडळाशी केलेले किंवा शासनाकरिता किंवा विद्यमान मंडळाकरिता सर्व दायित्वे, केलेले सर्व करार आणि इतर सर्व बाबी व गोष्टी या मंडळाद्वारे किंवा या मंडळाशी किंवा या मंडळाकरिता केलेले आहेत असे समजण्यात येईल आणि तद्नुसार शासनाद्वारे किंवा, यथास्थिति, विद्यमान मंडळाद्वारे किंवा त्याविरुद्ध चालविण्यात आलेले किंवा चालविण्यात येऊ शकतील असे दावे, केलेले सर्व खटले किंवा कायदेशीर कारवाई मंडळाद्वारे किंवा मंडळाविरुद्ध पुढे चालू ठेवता येतील किंवा चालविता येतील.

**२०.** (१) मंडळाचा एक सचिव असेल, त्याची नेमणूक शासन करील.

सचिव, सह-सचिव, उप-सचिव, सहायक सचिव, परीक्षा नियंत्रक, पद्धती विश्लेषक, वित्त अधिकारी व लेखा अधिकारी यांची नेमणूक, अधिकार व कर्तव्ये.

(२) अध्यक्षांच्या नियंत्रणाच्या अधीन राहून, सचिव हा मंडळाचा कार्यकारी अधिकारी असेल आणि त्या त्या वेळी मंडळाच्या नियंत्रणाखाली सेवा करीत असलेले इतर सर्व अधिकारी आणि कर्मचारी हे सचिवाच्या हाताखाली असतील.

(३) सचिवास मंडळाच्या बैठकींना हजर राहण्याचा हक्क असेल आणि तो मंडळाच्या सदस्य-सचिव म्हणून काम पाहील.

(४) सचिव, विनियमाद्वारे करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील व अशी इतर कर्तव्ये पार पाडील.

(५) शासन, मंडळाच्या शिफारशींवरून मंडळासाठी आवश्यक त्या संख्येत सह सचिव (तंत्र), उप सचिव (तंत्र), सहायक सचिव (तंत्र) परीक्षा नियंत्रक, पद्धती विश्लेषक, वित्त अधिकारी आणि लेखा अधिकारी यांसारख्या तंत्रविषयक कर्मचारीवर्गाची नियुक्ती करील.

(६) सह सचिव (तंत्र), उपसचिव (तंत्र), सहायक सचिव (तंत्र) परीक्षा नियंत्रक, पद्धती विश्लेषक, वित्त अधिकारी आणि लेखा अधिकारी हे सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाखाली सचिव त्यांना अनुक्रमे नेमून देईल अशा अधिकारांचा वापर करतील व अशी कर्तव्ये पार पाडतील.

(७) या अधिनियमाखाली नेमण्यात आलेले सचिव, सह सचिव (तंत्र), उप सचिव (तंत्र), सहायक सचिव (तंत्र) परीक्षा नियंत्रक, पद्धती विश्लेषक, वित्त अधिकारी आणि लेखा अधिकारी हे शासनाचे कर्मचारी असतील, या अधिकाऱ्यांची वेतन व भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती या शासन निर्धारित करील त्याप्रमाणे असतील.

**२१.** (१) मंडळास, शासनाच्या मान्यतेने, त्याची या अधिनियमाखालील कार्ये सक्षम रीतीने पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील असे इतर अधिकारी व कर्मचारी नेमता येतील.

मंडळाचे इतर अधिकारी व कर्मचारी.

(२) पोट-कलम (१) अन्वये नियुक्त केलेले अधिकारी व कर्मचारी यांचे वेतन, भत्ते आणि सेवेच्या इतर शर्ती या मंडळ विनियमाद्वारे निश्चित करील त्याप्रमाणे असतील.

## प्रकरण तीन

## [1][नियामक परिषदेचे व मंडळाचे]अधिकार व कर्तव्ये.

[2][**२१क.** या अधिनियमांच्या तरतुदींना अधीन राहून, नियामक परिषदेचे अधिकार व कर्तव्ये पुढील प्रमाणे असतील :—

नियामक परिषदेचे अधिकार व कर्तव्ये.

(क) मंडळाने सुपूर्द केलेल्या बाबी हाताळणे आणि मंडळाच्या शिफारशींना व निर्णयांना अंमलबजावणीच्या दृष्टीने मान्यता देणे ;

(ख) उद्योग समूहांशी विचारविनियम करून सम्यक विकास योजना तयार करणे ;

(ग) कर्मचाऱ्यांसंबधी विनियम व त्यांच्या मंजुरीशी संबंधित बाबी यांना मान्यता देणे ;

(घ) मंडळाच्या लेख्यांची चाचणी लेखापरीक्षा नियमितपणे आणि नियामक परिषदेला योग्य वाटेल अशा कालांतराने करण्याची शासनाला शिफारस करणे ;

(ङ) संस्थेचे अधिस्वीकृती धोरण ठरविणे ;

(च) मंडळाने सुपूर्द केलेल्या वित्तीय बाबींशी संबंधित अधिकारांचा वापर करणे ;

---

[1] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १० अन्वये "मंडळ" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ११ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

अर्थसंकल्पाला मान्यता देणे ;

.रणात्मक निर्णयांच्या अंमलबजावणीच्या

.मचारी यांच्या नियुक्ती संबंधात सेवेच्या अटी व .स्त व कर्तव्ये, सेवा भरतीची पद्धत व वेतनमान यांना मान्यता देणे ;

.खालील संस्थांचे योग्य प्रचलन, कामकाज व निधी याच्याशी .त्याही बाबींच्या संबंधात चौकशी करण्याची शासनाला शिफारस

.नियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, मंडळाचे अधिकार व कर्तव्ये पुढीलप्रमाणे

.) शासनाला सर्वसाधारणपणे पदविका स्तरावरील तंत्र शिक्षणाशी संबंधित धोरण .षयक बाबींवर आणि विशेषकरून पुढील बाबींवर सल्ला देणे,—

(एक) पदविका स्तरावरील तंत्र शिक्षणात राष्ट्रीय धोरणे व राज्याची धोरणे यांमध्ये समन्वय साधणे ;

(दोन) माध्यमिक, उच्च माध्यमिक, पदवी शिक्षण आणि पदविका पातळीवरील शिक्षण यांमध्ये समन्वय ठेवणे ;

(तीन) पदविका स्तरावरील तंत्र शिक्षणाचा दर्जात एकरूपता राखणे ;

(चार) उद्योगसंस्थामध्ये क्रियेस परस्पर सहकार्यास चालना देणे.

(ख) अभ्यासक्रम व पाठ्यक्रम ठरविण्यासाठी मार्गदर्शक तत्त्वे घालून देणे, तसेच पदविका स्तरावरील तंत्र शिक्षणाच्या सर्व प्रकारांकरिता तपशीलवार अभ्यासक्रम व पाठ्यक्रम तयार करणे ; जसे-नियमित, मिश्र, अंशकालिक, पत्रव्यवहार पाठ्यक्रम, वार्षिक, सहामाही पद्धतीच्या आणि तत्सम ;

(ग) कर्मचारीवर्गासाठीची इमारत, फर्निचर, साधनसामग्री लेखनसामग्री आणि पदविका स्तरावरील संस्थाना लागणाऱ्या इतर गोष्टी यांच्या संबंधात प्रमाणभूत गरजा विहित व विनियमित करणे ;

(घ) पदविका स्तरावरील पाठ्यक्रमासाठी, कोणतेही पुस्तक, पाठ्यपुस्तक आणि संदर्भ पुस्तक म्हणून विहित आणि विकसित करणे, किंवा कोणतीही पुस्तके आणि मुद्रित झालेले किंवा अमुद्रित साहित्य तयार करणे किंवा तयार करण्याची व्यवस्था करणे, किंवा प्रत्यक्ष किंवा कोणत्याही इतर एजन्सीच्या सहयोगाने शिक्षणाचे साहित्य प्रकाशित करणे ;

(ङ) परीक्षेसाठी नियमित आणि माजी विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यासंबंधीच्या सर्वसाधारण शर्ती विहित करणे, आणि पात्रता, उपस्थिती, सत्रातील अभ्यास आणि वर्तणूक यासंबंधीच्या या शर्ती पूर्ण करण्यात आल्यावर विद्यार्थ्याला अशा कोणत्याही परीक्षेसाठी प्रवेश मिळेल आणि त्या परीक्षेला बसण्याचा हक्क प्राप्त होईल त्या शर्ती विनिर्दिष्ट करणे ;

(च) पदविकेच्या अंतीम परीक्षेत उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रमाणपत्रे देणे ;

(छ) शिष्यवृत्त्या, अधिछात्रवृत्त्या, विद्यावेतने, पदके, बक्षिसे आणि इतर पारितोषिके सुरू करणे व देणे आणि त्यासाठी शर्ती विहित करणे ;

(ज) मृत्यूपत्रित दाने, देणग्या, दानविधी, विश्वस्तव्यवस्था आणि कोणत्याही मालमत्तेची किंवा तिच्यातील हितसंबंधाची अथवा तिच्यातील हक्काची इतर हस्तांतरणे स्वीकारणे ;

अधिकारांचा वापर करणे किंवा सोपव

(फ) संस्थेला विद्याविषयक स्वायत्तत

दिलेली स्वायत्तता रद्द करणे यांसाठी [२][निर

[१] सन२००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १२ (५

आला.

[२] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ यांच्या कलम १२ (ख) अन्वये " शासन "या म

ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) राज्यातील पदविका स्तरावरील तंत्र शिक्षण सुधारणे, त्याची व्याप्ती वाढवणे आणि त्याचा विस्तार करणे आणि पदविका स्तरावरील तंत्र शिक्षणाचा दर्जा कायम राखणे व वृद्धींगत करणे यांसारखी या अधिनियमांची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी आवश्यक अशा सर्व कृती करणे ;

(भ) संस्थाना संलग्नीकरण मंजूर करणे, अधिस्वीकृती, स्वायत्त दर्जा, सममूल्यता, पात्रता प्रदान करण्यासाठी आणि संलग्नीकरण, किंवा अधिस्वीकृती किंवा सममूल्यता किंवा स्वायत्त दर्जा किंवा पात्रता याचा पुनर्विचार करण्यासाठी किवा ती रद्द करण्यासाठी विनियम करणे ;

(म) उमेदवारांना परीक्षेसाठी प्रवेश देणे तसेच, संस्थांचे संलग्नीकरण, अधिस्वीकृती, स्वायत्तता, सममूल्यता यांसाठी विहित करण्यात येईल अशा फीची मागणी करणे व ती घेणे ;

(य) मंडळाच्या परीक्षा घेणे ;

(यक) परीक्षा घेणे, उमेदवारांच्या प्रगतीचे मूल्यमापण करणे, अणि निकालांचे संकलन करून ते जाहीर करणे यांसाठी प्राश्निक, परीक्षक, नियामक, पर्यवेक्षक आणि इतर आवश्यक कर्मचारीवर्गाची नेमणूक करणे ;

(यख) विनियमांनुसार परीक्षेसाठी उमेदवारांना प्रवेश देणे ;

(यग) मंडळाच्या परीक्षा घेण्यासाठी मंडळाच्या अधिकारितेमध्ये केंद्रे उघडणे ;

(यघ) परीक्षांना बसलेल्या उमेदवांराचे निकाल निश्चित करण्यात येईल अशा दिनांकाला किंवा दिनांकाना जाहीर करणे ;

(यङ) गुणावत्तेनुसार उमेदवारांची यादी तयार करणे ;

(यच) अनुचित साधनांचा वापर करण्याच्या प्रकरणांचा परामर्श, निर्धारित केलेल्या कार्यपद्धतीनुसार घेणे ;

(यछ) अंतिम परीक्षेसह पदविका स्तरावरील सर्व परीक्षांमधील विद्यार्थ्यांच्या व संस्थांच्या कामगिरीचे सर्वसाधारण मूल्यमापन करणे ;

(यज) मंडळाने मान्यता दिलेल्या पदविका स्तरावरील कोणत्याही संस्थांकडून विद्याविषयक दर्जा राखला जात असल्याची खात्री करून घेण्यासाठी कोणतीही माहिती मागविणे, मंडळाने मान्यता दिलेल्या परंतु आवश्यक तो शैक्षणिक दर्जा राखला जात नसलेल्या, पदविका स्तरावरील संस्थांशी संबंधित विशेष अहवाल व माहिती प्रादेशिक सहसंचालक, तंत्रशिक्षण यांच्याकडून मागवणे आणि अतिशय कमी शैक्षणिक निकाल आणि गंभीर स्वरूपाच्या शैक्षणिक अनियमितता आढळतील अशा प्रकरणात शासनाच्या तंत्र शिक्षण विभागाकडून प्रशासनिक आदेशाद्वारे देण्यात आलेली मान्यता काढून घेण्याची शिफारस तंत्रशिक्षण संचालनालयास करणे ;

(यझ) शासनाच्या तंत्र शिक्षण विभागाने मान्यात दिलेल्या संस्थाना परीक्षांच्या संचालनाबाबत सहकार्य करण्याबद्दल फर्मावणे आणि ज्या संस्था परीक्षांच्या संचालनात आवश्यक असणाऱ्या सुविधा मंडळाकडे सोपवण्याबाबत कसूर करतील अशा कोणत्याही संस्थांचे विशेषाधिकार, असे आदेश का काढू नयेत याबाबत त्यांना कारणे दाखविण्याची वाजवी संधी दिल्यानंतर काढून घेणे ; आणि

(यञ) (एक) मंडळाच्या कार्यालयांचे कामकाज,

(दोन) प्रादेशिक कार्यालयांचे कामकाज,

(तीन) मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांना निवासी जागा पुरविणे,

यासाठी आवश्यक असलेली कोणताही मालमत्ता किंवा पायाभूत सुविधा निर्माण करणे, तीवर मालकी तत्त्वावर घेणे, ती धारण करणे किंवा भाड्याने घेणे.

[२][(यट) शैक्षणिक कार्याचे नियोजन व संनियंत्रण करणे ;

(यठ) गरजांवर आधारित अभ्यासक्रम, स्वयंरोजगारासाठी विशेष अभ्यासक्रम, ग्रामीण वंचित व्यक्ती व महिलांसाठी अभ्यासक्रम चालू करणे ;

(यड) पात्र संस्थाना स्वायतता देण्याचे प्रस्तावित करणे ;]

मंडळाच्या [४][संचालकांचे] अधिकार आणि कर्तव्ये.

**२३.** (१) या अधिनियमाच्या तरतुदी आणि त्याखाली करण्यात आलेले विनियम आणि उपविधी यांचे निष्ठापूर्वक पालन केले जात आहे याची निश्चिती करणे हे, मंडळाच्या [३][संचालकाचे] कर्तव्य असेल आणि या प्रयोजनासाठी आवश्यक ते सर्व अधिकार त्याच्याकडे असतील.

(२) कोणत्याही निकडीच्या प्रसंगी ताबडतोब कारवाई करण्यात आली पाहिजे असे मंडळाच्या [३][संचालकाचे] मत असेल तर, [३][संचालक] त्यास आवश्यक वाटेल अशी कारवाई करील आणि आपण केलेल्या कारवाईचा अहवाल मंडळास त्याच्या लगतनंतरच्या बैठकीत सादर करील.

(३) [३][संचालक], विहित करण्यात येतील अशा इतर अधिकारांचा वापर करील आणि अशा इतर कर्तव्यांचे पालन करील.

निदेश काढण्याचे शासनाचे अधिकार.

**२४.** (१) शासनाला, मंडळाने (जर कोणताही) सल्ला दिलेला असल्यास तो सल्ला विचारात घेतल्यानंतर कलम २२ च्या खंड (क) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबीसंबंधात त्यास आवश्यक वाटतील असे निदेश मंडळास देण्याचा अधिकार असेल संबंधित मंडळ, अशा निदेशांचे अनुपालन करील.

(२) तसेच, शासनास, मंडळाने चालविलेल्या किंवा केलेल्या कोणत्याही गोष्टीसंबंधात किंवा मंडळ चालवित असलेल्या किंवा करीत असलेल्या किंवा चालविण्याचा किंवा करण्याचा मंडळाचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीसंबंधात सूचना देण्याचा आणि त्या बाबतीतील आपली मते मंडळास कळविण्याचा हक्क असेल.

(३) मंडळ, कळविण्यात आलेल्या बाबीसंबंधात कोणतीही कारवाई केली असल्यास किंवा करण्याचे योजिले असल्यास, तसे शासनाला कळवील आणि अशी कारवाई करण्यात जर त्याने कसूर केली असेल तर त्याबाबत स्पष्टीकरण देईल.

(४) दर मंडळाने शासनाचे समाधान होईल अशा रीतीने वाजवी वेळेत कारवाई केली नाही तर, शासनास, मंडळाने दिलेले स्पष्टीकरण किंवा केलेले अभिवेदन विचारात घेतल्यानंतर या अधिनियमाशी सुसंगत असणारे व त्यास आवश्यक वाटतील असे निदेश देता येतील आणि मंडळ, अशा निदेशांचे अनुपालन करील.

(५) निकडीच्या वेळी, तात्काळ उपाययोजना करणे आवश्यक आहे असे शासनाचे मत होईल तर, शासनास संबंधित मंडळाशी आगाऊ विचारविनियम न करता, या अधिनियमाशी

[१] सन२००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १२ (ख) अन्वये "शासन" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ यांच्या कलम १२ (घ) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३ (क) अन्वये " अध्यक्ष " या मजकुरा ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १३ (ख) अन्वये " अध्यक्ष " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

सुसंगत असणारी त्यास आवश्यक वाटेल अशी कारवाई करता येईल, आणि शासन, केलेल्या कारवाईबाबत मंडळास ताबडतोब कळवील.

(६) मंडळाचा कोणताही ठराव, आदेश किंवा कृती ही, मंडळास या अधिनियमाद्वारे किंवा त्याअन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा अतिरेक करून करण्यात आली आहे असे शासनाचे मत होईल तर, शासनास, लेखी आदेशाद्वारे आणि कारणे विनिर्दिष्ट करून मंडळाचा कोणताही ठराव किंवा आदेश याची अंमलबजावणी स्थगित करता येईल आणि मंडळाने जी कारवाई करण्याचा आदेश दिला असेल किंवा तसा आदेश दिला असल्याचे दिसून येत असेल अशी कारवाई करण्यास प्रतिबंध करता येईल.

## प्रकरण चार

## परवानगी, संलग्नीकरण, स्वायत्त दर्जा व सममूल्यता प्रदान करणे.

संलग्नीकरणाच्या शर्ती.

**२५.** (१) संलग्नीकरणासाठी अर्ज करणारे व्यवस्थापन आणि ज्याच्या संस्थेला विनिर्दिष्ट कालावधीसाठी संलग्नीकरण प्रदान करण्यात आले आहे असे व्यवस्थापन पुढील हमी देईल आणि तिचे अनुपालन करील,—

(क) अधिनियम आणि त्याखालील विनियम यांच्या तरतुदींने आणि मंडळाच्या स्थायी आदेशांचे आणि निदेशांचे पालन करण्यात येईल ;

(ख) संलग्न तंत्रनिकेतन किंवा संस्था यांच्याकरिता तरतुद केलेली एक वेगळी स्थानिक व्यवस्थापन समिती असेल ;

(ग) अभ्यासक्रमांसाठी प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या, मंडळाने आणि शासनाने वेळोवळी विहित केलेल्या मर्यादांपेक्षा अधिक नसेल ;

(घ) विहित करण्यात येईल त्याप्रमाणे इमारती, प्रयोगशाळा, ग्रंथालये पुस्तके, अध्यापनासाठी व संशोधनासाठी आवश्यक साधनसामग्री, वसतिगृहे, व्यायामशाळा यांसारख्या योग्य व पुरेशा वास्तविक सुविधा असतील ;

(ङ) संस्थेची वित्तीय साधनसंपत्ती ही, तिची देखभाल व कामकाज सातत्त्याने चालविण्यासाठी पुरेशी तरतूद करणारी असेल ;

(च) मान्यताप्राप्त संलग्न संस्था यांच्या अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांची संख्या व अर्हता आणि संलग्न संस्थांच्या कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या अटी व शर्ती आणि वित्तलब्धी या, मंडळाने विहित केल्याप्रमाणे असतील आणि अभ्यासक्रम, अध्यापन किंवा प्रशिक्षण किंवा संशोधन कार्यक्षमतेने चालण्यासाठी योग्य ती तरतूद करण्यास पुरेशा असतील ;

(छ) संलग्न करून घेण्यात यावयाच्या संस्थेच्या सर्व अध्यापक व अध्यापकेतर कर्मचाऱ्यांच्या सेवा आणि त्या संस्थेच्या सुविधा, परीक्षा घेण्यासाठी आणि मंडळाच्या इतर कार्यक्रमांना चालना देण्यासाठी उपलब्ध करून देण्यात येतील ;

(ज) अधिनियमाच्या किंवा विनिमय यांच्या तरतुदींअन्वये मंडळाचे [१][संचालक], आणि इतर अधिकारी यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून त्यांनी दिलेले निदेश व आदेश यांचे अनुपालन करण्यात योईल ;

(झ) मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय, व्यवस्थापनामध्ये बदल किंवा त्याचे स्थानांतरण करण्यात येणार नाही ;

(ञ) मंडळाच्या पूर्वपरवानगीशिवाय संस्था बंद करण्यात येणार नाही ;

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ च्या कलम १३ (ख) अन्वये " अध्यक्ष " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ट) कलम ३२ किंवा, यथास्थिति, ३५ अन्वये महाविद्यालय किंवा संस्था यांचे संलग्नीकरण रद्द करण्यात किंवा मान्यता काढून घेण्यात आल्यास किंवा संस्था बंद करण्यात आल्यास शासनाने सहायक अनुदान म्हणून दिलेल्या रकमेमधून बांधण्यात किंवा निर्माण करण्यात आलेल्या , संस्थेच्या इमारती व साधनसामग्रीसह सर्व मत्ता शासनाकडे निहित होतील.

(२) दुसऱ्या मंडळाचा भाग असलेल्या संस्थेचे संलग्नीकरण मूळ मंडळाकडून " ना हरकत प्रमाणपत्र " मिळाल्याशिवाय केले जाणार नाही.

२६. [1][* * *] — परवानगी संबंधीची कार्यपद्धती.

(३) नवीन संस्था सुरू करण्यासाठी परवानगी मागणारे व्यवस्थापन, ज्या वर्षापासून परवानगी मागितली असेल त्याच्या अगोदरच्या वर्षाच्या ऑक्टोबर महिन्याच्या शेवटच्या दिवसापूर्वी [2][मंडळाच्या] सदस्य सचिवाकडे विहित नमुन्यात अर्ज करील.

(४) पूर्वोक्त विहित कालमर्यादेत मिळालेल्या अशा सर्व अर्जांची मंडळाकडून छाननी करण्यात येईल आणि ते अर्ज त्या वर्षाच्या डिसेंबर महिन्याच्या शेवटच्या दिवशी किंवा त्यापूर्वी शासनाकडे पाठवण्यात येतील.

(५) शासन, मंडळाने शिफारस केलेल्या अर्जांपैकी त्याला त्याच्या निरपवाद स्वेच्छानिर्णयानुसार उचित व योग्य वाटतील अशा संस्थांना परवानगी देऊ शकेल व तसे करताना ते शासनाची अर्थसंकल्पीय साधनसंपत्ती, नवीन संस्था सुरू करण्याची परवानगी मागणाऱ्या व्यवस्थापनांची योग्यायोग्यता आणि तंत्र शिक्षणाच्या संस्थांच्या स्थाननिश्चयनासंबंधातील राज्यस्तरीय अग्रक्रम विचारात घेईल :

परंतु असे की, अपवादात्मक प्रकरणांमध्ये आणि कारणे लेखी नमूद करून शासन तंत्र शिक्षणाची नवीन संस्था सुरू करण्यासाठी आलेल्या, मंडळाने शिफारस न केलेल्या अशा कोणत्याही अर्जाला मान्यता देऊ शकेल.

(६) तंत्र शिक्षणाची नवीन संस्था सुरू करण्याची परवानगी मिळण्यासाठी आलेला कोणताही अर्ज, शासन थेट दाखल करून घेणार नाही.

२७. (१) कलम २६ अन्वये शासनाकडून परवानगी मिळाल्यानंतर मंडळ पोट-कलम (२) मध्ये दिलेल्या विहित कार्यपद्धतीचे अनुसरण करून आणि नवीन संस्थेने ठरलेल्या शर्तींचे पालन केलेले आहे काय आणि कोणत्या मर्यादेपर्यंत पालन केलेले आहे ते विचारात घेतल्यानंतर, त्या संस्थेला पहिल्या वेळेच्या संलग्नीकरणास मंजुरी देण्याबाबत विचार करील. या संबंधातील मंडळाचा निर्णय अंतिम असेल. — संलग्नीकरण कार्यपद्धती.

(२) संलग्नीकरणास मंजुरी मिळण्याबाबतचा अर्ज विचारात घेण्याच्या प्रयोजनासाठी मंडळ, त्याने या प्रयोजनासाठी रचना केलेल्या समितीकरवी चौकशी करण्याची व्यवस्था करील.

(३) मंडळ पुढील बाबतीत निर्णय घेईल :—

(क) संलग्नीकरणास मंजुरी द्यावयाची किंवा नाकारावयाची ;

(ख) संलग्नीकरणास पूर्णतः मंजुरी द्यावयाची की अंशतः द्यावयाची ;

(ग) विषय, अभ्यासाचे पाठ्यक्रम व प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संख्या ;

(घ) संलग्नीकरणास मंजुरी देताना करारनिविष्ट करता येतील अशा कोणत्याही असल्यास, त्या शर्ती.

---

[1] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १४ (क) द्वारें पोट-कलम (१) व (२) वगळण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १४ (ख) द्वारें हा मजकूर समाविष्ट करण्यात आले.

(४) सदस्यसचिव, संलग्नीकरणाचा अर्ज मंजूर करण्यात आला असेल तर पुढील माहितीसह मंडळाचा निर्णय कळवील आणि एक प्रत संचालक, तंत्र शिक्षण यांस पाठवील :—

(क) संलग्नीकरणासाठी मान्यता देण्यात आलेले विषय आणि पाठ्यक्रम ;

(ख) प्रवेश द्यावयाच्या विद्यार्थ्यांची संस्था ,

(ग) ज्या शर्ती पूर्ण करण्याच्या अधीन राहून मान्यता देण्यात आलेली असेल अशा कोणत्याही शर्ती असल्यास, त्या शर्ती ;

(५) कलम २६ मध्ये निर्देशिलेली कार्यपद्धती योग्य त्या फेरफारांसह नवीन पाठ्यक्रम, जादा विद्याशाखा, नवीन विषय आणि जादा तुकड्या सुरू करण्यासंबंधीच्या परवानगीच्या बाबतीत लागू होईल ;

(६) मंडळाकडून संस्थेला प्रारंभिक संलग्नता देण्यात आल्याखेरीज, संस्था केणत्याही विद्यार्थ्याला प्रवेश देणार नाही.

(७) पोट-कलमे (१) ते (४) मध्ये निर्देशिलेली कार्यपद्धती योग्य त्या फेरफारांसह वेळोवेळी संलग्नीकरण चालू ठेवण्याचा विचार करण्याच्या बाबतीत लागू होईल.

संलग्नीकरण चालू ठेवणे.

**२८.** संलग्न संस्थेस, ज्याच्यासाठी संलग्नीकरणास मंजुरी देण्यात आली होती त्या पाठ्यक्रमांचे संलग्नीकरण पुढे चालू ठेवण्यासाठी अशा संलग्नीकरणाच्या समाप्तीच्या दिनांकापूर्वी सामान्यत:सहा महिने अगोदर अर्ज करता योईल. मंडळ, सलमे २५, २६ व २७ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कार्यपद्धतीचे, ती जेथवर संलग्नीकरण मंजूर करण्यासंबंधात लागू असेल तेथवर, पालन करील.

संलग्नीकरणाच्या व्याप्तीमध्ये वाढ करणे.

**२९.** संलग्न संस्थेस जादा पाठ्यक्रमांकरिता संलग्नीकरणासाठी अर्ज करता येईल. मंडळ, कलमे २५, २६ व २७ यांमधे विनिर्दिष्ट कार्यपद्धतीचे, ती सलग्नीकरण मंजूर करण्यास जेथवर लागू असेल तेथवर, पालन करील.

स्थायी संलग्नीकरण व मान्यता.

**३०.** कमीत कमी सहा वर्षे संलग्न असलेल्या संस्थेला स्थायी संलग्नीकरणासाठी अर्ज करता येईल. मंडळ अर्जावर विचार करील आणि त्याची छाननी करील. संलग्नीकरण्याच्या सर्व शर्ती संलग्न संस्था समाधाणकारकपणे पूर्ण करीत आहे याबद्दल आणि तिने मंडळाकडून वेळोवेळी विहित करण्यात आलेला उच्च शैक्षणिक व प्रशासकीय दर्जा प्राप्त केलेला आहे याबद्दल मंडळाची खात्री पटली तर, त्या संस्थेला कायमचे संलग्नीकरण देईल.

संस्थांची तपासणी व अहवाल.

**३१.** (१) संस्थेचा विद्याविषयक दर्जा व विद्याविषयक प्रशासनाचा दर्जा याबाबत निर्णय घेणे मंडळाला शक्य व्हावे म्हणून मंडळ निदेश देईल असे अहवाल, विवरणे व इतर तपशील प्रत्येक संलग्न संस्था सादर तरील.

(२) [१][संचालक] प्रत्येक संलग्न संस्थेची त्याने त्या बाबतीत नियुक्त केलेल्या एका किंवा अधिक समित्यांकडून प्रत्येक तीन वर्षांतून किमान एकदा तपासणी करण्याची व्यवस्था करील.

संलग्नीकरण किंवा मान्यता काढून घेणे.

**३२.** (१) जर संलग्न संस्था कलम २५ मध्ये तरतूद केलेल्या संलग्नीकरणाच्या शर्तीचे अनुपालन करण्यात कसूर करील तर, मंडळ, संलग्नीकरणाद्वारे संस्थेस प्रदान करण्यात आलेले विशेषाधिकार अंशत: किंवा संपूर्णत: का काढून घेण्यात येऊ नयेत किंवा त्यात का फेरबदल करण्यात येऊ नयेत, याबाबतची कारणे दाखल नोटीस व्यवस्थापनाला पाठवू शकेल.

---

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ अन्वये "अध्यक्ष" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) मंडळ, उपरोल्लिखित कार्यवाही करण्याचे त्याने का योजले आहे याबद्दलच्या कारणांचा उल्लेख करील व नोटिशीची एक प्रत प्राचार्य किंवा संस्थेचा प्रमुख यांच्याकडे पाठवील. मंडळ, नोटीशीच्या उत्तरादाखल व्यवस्थापनाने किती मुदतीत आपले लेखी निवेदन सादर केले पाहिजे ती मुदतही त्या नोटीशीत विनिर्दिष्ट करील ; ही मुदत तीस दिवसांपेक्षा कमी असणार नाही.

(३) असे लेखी निवेदन मिळाल्यावर, किंवा पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या नोटीशीत विनिर्दिष्ट केलेली मुदत संपल्यावर, मंडळ, असे विशेषाधिकार काढून घेण्याबाबतच्या किंवा त्यात फेरबदल करण्याबाबत कोणतीही कार्यवाही करायची असल्यास करील.

(४) मंडळ, संस्थेमधील विद्यार्थ्यांचे हित लक्षात घेऊन, शासनाकडे, या बाबतीत करावयाच्या कार्यवाहीची शिफारस करील आणि त्यानंतर शासन, त्या शिफारशीची अंमलबजावणी करील.

**३३.** (१) स्वायत्त दर्जाकरिता आपण पूर्णपणे पात्र आहोत असे समजणारे मान्यताप्राप्त तंत्रनिकेतन किंवा संस्था, ज्या वर्षापासून स्वायत्त दर्जा मिळण्यासाठी अर्ज करावयाचा असेल त्याच्या आधीच्या वर्षाच्या ३१ ऑगस्ट रोजी किंवा त्यापूर्वी मंडळाच्या सचिवाकडे मंडळाकडून विहित करण्यात आलेल्या नमुन्यामध्ये अर्ज करतील. स्वायत दर्जा प्रदान करणे.

(२) मंडळाचा सचिव, तो अर्ज शैक्षणिक समितीपुढे सादर करील आणि शैक्षणिक समिती उपरोल्लिखित निकषांवर अर्जाची छाननी करून तो अर्ज विचारात घेण्यास सकृद्दर्शनी कारण आहे किंवा कसे, यावर निर्णय देईल. अर्जास सकृद्दर्शनी कारण आहे असा समितीचा निर्णय झाल्यास, तंत्रनिकेतन किंवा संस्था याचा प्राचार्य, अध्यापक वर्ग व विद्यार्थी यांच्याशी चर्चा करून देखील स्थानिक चौकशी करील.

(३) स्थानिक चौकशी, निकषाच्या मुद्द्यावर आणि प्रमाणके विनिर्दिष्ट केलेली असतील त्या बाबतीत त्या प्रमाणकानुसार सुविधा अस्तित्वात आहेत काय ते पाहण्यासाठी व समितीला आवश्यक वाटेल अशा अधिक माहितीसाठी करण्यात येईल.

(४) मंडळाचा सचिव, अर्ज व त्याची छाननी आणि स्थानिक चौकशी झाल्यानंतरचा शैक्षणिक समितीचा अहवाल, मंडळासमोर त्यांच्या बैठकीमध्ये सादर करील. या बैठकीमध्ये अहवाल स्वीकारण्यात यावा की फेटाळण्यात यावा किंवा कसे याची नोंद असलेला ठराव पारित करण्यात येईल. जर मंडळाने बहुमताने किंवा एकमताने अर्ज व अहवाल फेटाळल्यास आणि स्वायत्त दर्जा प्रदान करण्याची शिफारस न करण्याचा निर्णय घेतल्यास, मंडळ त्या संबंधीच्या कारणाची नोंद करील. जर मंडळाने अर्ज मंजूर करण्याचे अणि स्वायत्त दर्जा प्रदान करण्याची शिफारस करण्याचे प्रस्तावित केल्यास मंडळ, तशा अर्थाचा ठराव पारित करील आणि ज्या शर्तींच्या अधीन राहून, स्वायत्त दर्जा प्रदान करण्यात आला त्या शर्तीदेखील विनिर्दिष्ट करील.

(५) मंडळाचा सचिव, ठरावाची एक प्रत आणि मंडळ ठरवील असे इतर अभिलेख यांसह मंडळाच्या अशा शिफारशी सचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन यांना एका महिन्याच्या आत मान्यतेसाठी सादर करील.

(६) अर्ज करणाऱ्या तंत्रनिकेतनाला किंवा संस्थेला स्वायत्तता देण्यासंबंधी शासनाकडून मान्यता मिळाल्यावर मंडळाचा सचिव, त्या तंत्रनिकेतनाला किंवा संस्थेला त्याबद्दल, कोणत्याही शर्ती असतील तर त्यांसह लेखी कळवील.

(७) स्वायत्तता नाकारावयाची असेल तर, ते सुद्धा संबंधित तंत्रनिकेतनाला किंवा संस्थेला कळविण्यात येईल.

स्वायत्तता मिळण्याकरिता अर्ज आल्याच्या शेवटच्या दिनांकापासून १० महिन्यांच्या आत वरील १ ते ७ मधील कार्य पूर्ण करावयाची आहेत.

(८) अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, नवी दिल्ली यांनी स्वायत्ततेच्या संबंधात वेळोवेळी तरतूद केलेली कोणतीही मार्गदर्शक तत्त्वे, नियम, विनियम, इत्यादी स्वायत्तता मागणाऱ्या तंत्रनिकेतनाला अथवा संस्थेला आणि स्वायत्ततेचा दर्जा ज्यांना अगोदरच देण्यात आला आहे अशा तंत्रनिकेतनांना किंवा संस्थाना लागू होतील.

सममूल्यता आणि पात्रता.

**३४.** (१) स्वायत्तता मिळालेल्या संस्थांनी त्यांच्या पाठ्यक्रमांसाठी आणि कार्यक्रमांसाठी मंडळांकडून सममूल्यता मिळविणे आवश्यक राहील.

(२) स्वायत्त संस्था, त्यांचे अभ्यासक्रम, अध्यापन आणि परीक्षा योजना, मंडळाकडून वेळोवेळी मान्य करून घेतील.

(३) मंडळ, अशा स्वायत्त संस्थांचे तीन वर्षांतून किमान एकदा निरीक्षण करील.

(४) स्वायत्त संस्थांचे अभ्यासक्रम, अध्यापन, परीक्षा योजना, शिकवण्याचे तास, शैक्षणिक वेळापत्रक, परीक्षेला बसण्यासाठी उमेदवारांची पात्रता, इत्यादी सारख्या सर्व शैक्षणिक आणि परीक्षेशी संबंधित सर्व कार्याचे मंडळ संनियंत्रण करील.

(५) स्वायत्त तंत्रनिकेतनाचे किंवा संस्थेचे नियामक मंडळ आणि इतर समित्या यांवर मंडळाचे प्रतिनिधी असतील.

(६) मंडळ, रोजगाराच्या, शिक्षणाच्या, प्रयोजनासाठी कोणत्याही पदविकेला,पदविकोत्तर पदविकेला, पदव्युत्तर पदविकेला, प्रगत पदविकेला किंवा महाराष्ट्रात, महाराष्ट्राबाहेर किंवा भारताबाहेर असलेले कोणतेही तत्सम मंडळ, विद्यापीठ, कोणतेही परीक्षा प्राधिकरण यांच्या नियत्रणाखाली कोणत्याही शासकीय मान्यताप्राप्त संस्थेने चालवलेल्या अशा कोणत्याही कार्यक्रमाला, अभ्यासक्रमाची छाननी करून सममूल्यता प्रदान करील.

(७) मंडळ, त्याची कोणतीही पदविका, पदविकोत्तर पदविका, पदव्युत्तर पदविका, प्रगत पदविका किंवा मंडळ चालवत असलेला असा कोणताही कार्यक्रम यासाठी, आवश्यक असेल त्या त्या वेळी, भारतातील किंवा भारताबाहेरील कोणत्याही तत्सम मंडळाकडून, महाविद्यालयाकडून, विद्यापीठाकडून किंवा इतर कोणत्याही परीक्षा प्राधिकरणाकडून सममूल्यता मिळवील.

(८) कोणताही पाठ्यक्रम किंवा कार्यक्रम याला देण्यात आलेल्या सममूल्यतेच्या आधारावर मंडळ पात्रता प्रमाणपत्रे देईल.

संस्था बंद करणे.

**३५.** (१) शासनाच्या पूर्वपरवानगीखेरीज संस्थेच्या व्यवस्थापनाला संस्था बंद करण्याची अनुमती देण्यात येणार नाही.

(२) संस्था बंद करू इच्छिणारे व्यवस्थापन [१][आधीच्या वर्षाच्या १ एप्रिल महिन्याच्या शेवटच्या दिवशी] संस्था बंद करण्यासंबंधीची सर्व कारणे नमूद करून आणि इमारती व साधनसामग्री यांच्या स्वरूपात असलेल्या मत्ता, त्यांची मूळ किंमत, प्रचलित बाजार मूल्य आणि त्यास शासनाकडून किंवा सार्वजनिक वित्त पुरवठा संस्थांकडून वेळेपर्यंत मिळालेली अनुदाने यांचा निर्देश करून मंडळाकडे अर्ज करील.

(३) असा अर्ज मिळाल्यावर ती संस्था बंद करण्यास परवानगी देण्यात यावी किंवा कसे याचे मूल्यमापन करण्यासाठी व ते ठरविण्यासाठी मंडळ, त्याला योग्य वाटेल अशी चौकशी

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम २ (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

करण्याची व्यवस्था करील. आवश्यक ते सहाय्य देऊन किंवा शासनाने संस्था ताब्यात घेऊन किंवा अन्य व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करून संस्था बंद करण्याची बाब टाळता येईल किंवा कसे याचीही तपासणी मंडळास करता येईल.

(४) मंडळाने संस्था बंद करण्याची शिफारस करण्याचे ठरविल्यास ते मंडळ, व्यवस्थापनाकडून वसूल करावयाच्या नुकसानभरपाईच्या किंवा भरपाईच्या रकमेचे प्रमाण, शासन किंवा इतर सार्वजनिक वित्तपुरवठा संस्था यांच्याकडून पुरविण्यात आलेल्या पैशाचा वापर करून निर्माण करण्यात आलेल्या मत्ता शासनाकडे किंवा इतर व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्यात याव्यात किंवा कसे व कमी करण्यात आलेले अध्यापक व कर्मचारी वर्ग यांना द्यावयाची भरपाई याबाबतीत अहवाल तयार करील व ती शासनाला सादर करील.

(५) [१][मंडळाने, संलग्न संस्था बंद करण्याची शिफारस केली असेल तर, शासन, ते बंद करण्याचे आदेश देऊ शकेल.]

(६) शासन, ती संस्था ताब्यात घेण्याचे किंवा अन्य व्यवस्थापनाकडे हस्तांतरित करण्याचे ठरवील तर त्याबाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती ही, शासन विहित करील त्याप्रमाणे असेल.

(७) संस्थेत आधीच प्रवेश दिलेल्या विद्यार्थ्यांचे नुकसान होऊ नये या दृष्टीने, संस्था बंद करण्याची पद्धती टप्प्या टप्प्याने करण्यात येईल व पहिल्या वर्षाचे वर्ग प्रथम बंद करण्यात येतील आणि कोणालाही नव्याने प्रवेश दिला जाणार नाही. संस्था टप्प्याटप्प्याने बंद करण्याची पद्धती ही शासनाने विहित केल्याप्रमाणे असेल.

## प्रकरण पाच

## निधी, वित्तव्यवस्था, लेखा व लेखापरीक्षा.

**३६.** मंडळाकडे निहित असलेली सर्व मालमत्ता, निधी आणि इतर मत्ता मंडळ या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ आणि तरतुदीच्या अधीनतेने, धारण करील व वापरील. मंडळाच्या मतांचा वापर.

**३७.** (१) मंडळाचा स्वतःचा असा एक निधी असेल आणि त्यात पुढील रकमा जमा करण्यात येतील :— मंडळाचा निधी, त्याची अभिरक्षा व त्याची गुंतवणूक

(क) मंडळाने बसविलेली व गोळा केलेली फी, स्वामित्वधन व आकार, शास्तीसह ;

(ख) मंडळास, शासनाने कोणतीही अनुदाने, अभिहस्तांकित रकमा, अंशदाने आणि कर्जे दिली असल्यास ती ;

(ग) कोणतीही मृत्यूपत्रित दाने, देणग्या व दाननिधी किंवा इतर अंशदाने असल्यास ती ;

(घ) मंडळाकडे निहित असलेल्या कोणत्याही कर्जरोख्यांवरील व्याज आणि त्याच्या विक्रीचे उत्पन्न ;

(ङ) मंडळाकडे निहित असलेल्या मालमत्तेपासून मिळणारे सर्व भाडे व नफा ;

(च) मंडळास किंवा त्याच्या वतीने मिळालेला इतर पैसा.

(२) मंडळाला त्याच्या निधीपैकी विहित करण्यात येईल अशी रक्कम भारतीय स्टेट बँकेकडे किंवा बँक व्यवसाय विनियमन अधिनियम, १९४९ याच्या कलम २२ अन्वये भारतीय रिझर्व्ह बँकेने दिलेले लायसन धारण करणाऱ्या भारतीय रिझर्व्ह बँक अधिनियम, १९३४ यामध्ये करण्यात आलेल्या व्याख्येप्रमाणे असलेल्या कोणत्याही अनुसूचित बँकेकडे चालू किंवा ठेव खात्यात ठेवता येईल आणि उक्त रकमेपेक्षा अधिक असलेला कोणताही पैसा शासन मान्यता देईल अशा रीतीने गुंतवण्यात येईल. (१९४९ चा १०. १९३४ चा २.)

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम २ (ख) अन्वये नवीन पोट-कलम दाखल करण्यात आले.

(३) या संबंधात करण्यात आलेल्या विनियमाद्वारे मंडळ प्राधिकृत करील असे मंडळाचे अधिकारी अशा खात्यावर व्यवहार करतील.

निधीचा सर्वसाधारण वापर

**३८.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, मंडळाच्या निधीचा वापर या अधिनियमात विनिर्दिष्ट केलेल्या बाबींशी संबंधित आकार व खर्च देण्यासाठी आणि मंडळाला ज्या प्रयोजनासाठी या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये अधिकार प्रदान करण्यात आले असतील व मंडळावर कर्तव्ये सोपवण्यात आली असतील अशा इतर कोणत्याही प्रयोजनांसाठीच केवळ करण्यात येईल.

निधीतून रक्कम काढण्याची रीत.

**३९.** मंडळाने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने सही केलेल्या धनादेशाशिवाय किंवा पतपत्राशिवाय बँक, मंडळाच्या निधीमधून कोणतीही रक्कम देणार नाही.

प्रादेशिक कार्यालयांना नियतवाटप.

**४०.** प्रत्येक प्रादेशिक कार्यालयावर या अधिनियमाद्वारे मंडळाकडून लादण्यात आलेली कर्तव्ये व कामे पार पाडणे किंवा या अधिनियमाशी विसंगत नसतील अशी त्यांच्या अधिकारितेतील कामे किंवा विकास योजना पूर्ण करणे त्याना शक्य व्हावे म्हणून मंडळ निश्चित करील अशा रकमा ते वेळोवेळी देईल.

वार्षिक अर्थ-संकल्प तयार करणे.

**४१.** (१) मंडळ विहित करण्यात येईल अशा तारखेपूर्वी आणि अशा रीतीने पुढील वित्तीय वर्षाचा उत्पन्न व खर्चाचा अर्थसंकल्प तयार करील.

(२) मंडळ, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या तारखेस किंवा त्यानंतर आपण तयार केलेल्या अर्थसंकल्पावर विचार करील व त्याने मान्य केल्याप्रमाणे ते शासनास त्याच्या मंजुरीसाठी सादर करील. शासनास, अर्थसंकल्पाच्या संदर्भात त्यास योग्य वाटतील असे, आदेश काढता येतील व ते मंडळाला कळवता येतील. मंडळ, ते आदेश अंमलात आणेल.

वार्षिक लेखे व लेखापरीक्षण.

**४२.** (१) मंडळ, विहित केलेल्या नमुन्यात व रीतीने लेखे ठेवील.

(२) [१][नियामक परिषदेच्या] पूर्वसंमतीने मंडळाने नियुक्त केलेल्या लेखा परीक्षकाकडून मंडळाच्या लेख्याची लेखा परीक्षा करण्यात येईल.

(३) शासन, आवश्यकता भासल्यास मंडळाच्या लेख्याचे विशेष लेखा परीक्षक नेमून लेखा परीक्षा करील.

(४) लेखा परीक्षक किंवा विशेष लेखा परीक्षक, यथास्थिति, त्यांचा अहवाल मंडळास सादर करील व त्याची एक प्रत [२][नियामक परिषदेकडे] अग्रेषित करील.

(५) पोट-कलम (२) किंवा (३) अनुसार झालेला लेखा परीक्षेचा खर्च मंडळ भागवेल.

निरीक्षण व चौकशी.

**४३.** (१) शासनास, मंडळाने मान्यता दिलेल्या मंडळाशी संलग्न आणि अधिकृत असलेल्या कोणत्याही पदविका स्तरावरील संस्थांच्या इमारती, वसतिगृहे, प्रयोगशाळा, ग्रंथालये आणि साधनसामग्री यांचे, तसेच, अशा संस्थेतील किंवा तंत्रनिकेतनातील अध्यापन आणि इतर काम यांचे आणि तंत्रनिकेतन किंवा संस्थांच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही परीक्षेच्या संचालनाचे शासन निदेश देईल अशा व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून निरीक्षण करविण्याचा आणि मंडळाशी संबंधित असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात तशाच रीतीने चौकशी करविण्याचा हक्क असेल. प्रत्येक प्रकरणी, शासन, निरीक्षण किंवा चौकशी

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ च्या कलम ३(क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३(ख) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

करविण्याच्या आपल्या उद्देशाची मंडळाला रीतसर सूचना देईल आणि त्या मंडळावर एक प्रतिनिधी नेमण्यास हक्कदार असेल व अशा प्रतिनिधीस अशा निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या वेळी हजर राहण्याचा आणि बाजू मांडण्याचा हक्क असेल.

(२) शासन, अशा निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षांच्या संबंधात आपले विचार मंडळाला कळवील आणि मंडळाचे त्यावरील मत अजमाविल्यानंतर करावयाच्या कारवाईबद्दल त्याला सल्ला देऊ शकेल आणि अशी कारवाई करण्यासाठी कालमर्यादा निश्चित करू शकेल.

(३) निरीक्षणाच्या किंवा चौकशीच्या निष्कर्षांबाबत मंडळाने कोणतीही कारवाई केली असेल किंवा करावयाचे ठरविले असेल तर, त्यासंबंधी ते शासनास अहवाल देईल. असे अहवाल मंडळाच्या त्यावरील मतासह शासन निदेश देईल अशा वेळेच्या आत सादर करण्यात येईल.

(४) निश्चित केलेल्या वेळेच्या आत, शासनाचे समाधान होईल अशी कारवाई मंडळाने केली नसेल त्याबाबतीत, शासनास मंडळाने दिलेले कोणतेही स्पष्टीकरण किंवा अभिवेदन विचारात घेतल्यानंतर, आपणास योग्य वाटेल असे निदेश काढता येतील आणि मंडळ अशा निदेशांचे अनुपालन करील.

मंडळाने पुरवावयाची माहिती, विवरणपत्रे इत्यादी.

**४४.** (१) मंडळ, शासन पुरवण्यास सांगेल अशी अहवाल, विवरणपत्रे आणि विवरणे आणि कोणत्याही बाबीसंबंधात शासन मागवील अशी आणखी माहिती शासनास पुरवील.

(२) असे कोणतेही अहवाल, विवरणपत्रे किंवा विवरणे किंवा पुरविलेली माहिती विचारात घेतल्यानंतर, शासनास, या अधिनियमाशी सुसंगत असणारे, आवश्यक असे निदेश देता येतील आणि मंडळ अशा निदेशांचे अनुपालन करील.

## प्रकरण सहा

## अंनुपूरक आणि संकीर्ण तरतुदी.

समितीकडे सोपवलेल्या अधिकारांचा वापर करण्याची रीत.

**४५.** या अधिनियमाखाली मंडळाने वापर करण्यासाठी त्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार त्या मंडळाने विनियमांद्वारे समितीकडे सोपवले असतील त्या अधिकारांचा वापर करण्यासंबंधीच्या सर्व बाबी त्या समितीकडे सोपविल्या जातील आणि अशा कोणत्याही अधिकारांचा वापर करण्यापूर्वी, मंडळ, संबंधित बाबीसंबंधातील उक्त समिती चा अहवाल स्वीकारील व त्यावर विचार करील.

विनियम करण्याचा मंडळाचा अधिकार.

**४६.** (१) मंडळास, [१][नियामक परिषदेच्या मान्यतेने] या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, विनियम करता येतील.

(२) विशेषकरून आणि पूर्ववर्ती अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, अशा विनियमात पुढील सर्व किंवा कोणत्याही गोष्टींबाबत तरतूद करता येईल :—

(क) कलम १८ अन्वये नेमण्यात आलेल्या समित्यांची रचना, अधिकार व कर्तव्ये ;

(ख) परीक्षांचे विषय व अभ्यासक्रम ;

(ग) परीक्षेसाठी, नियमित आणि बाह्य उमेदवारांना प्रवेश देण्याबाबतच्या सर्वसाधारण शर्ती आणि विद्यार्थ्याला ज्या शर्ती पूर्ण करण्यात आल्यावर अशा कोणत्याही परीक्षेसाठी प्रवेश मिळण्याचा आणि त्या परीक्षेला बसण्याचा हक्क असेल अशा, पात्रता, उपस्थिती, सत्रातील काम आणि वर्तणुकीसंबंधीच्या कोणत्याही विशेष शर्ती ;

(घ) कोणत्याही विषयात व एकूण परीक्षेत उत्तीर्ण होण्यासाठी तसेच कोणत्याही विषयात सूट, विशेष योग्यता व विशेष प्राविण्या मिळविण्यासाठी आवश्यक असलेले गुण ;

[१] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ याच्या कलम १६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(ङ) परीक्षांसाठी प्रवेश फी व त्या परीक्षांच्या संबंधात इतर बाबींबाबत द्यावयाची इतर फी व आकार ;

(च) परीक्षा संचालन व निकाल प्रसिद्ध करणे यांची व्यवस्था ;

(छ) परीक्षकांची नेमणूक, परीक्षांसंबंधातील त्यांचे अधिकार व कर्तव्ये आणि त्यांचे पारिश्रमिक व ते देण्याची पद्धती ;

(ज) परीक्षकांची पात्रता व अपात्रता ;

(झ) प्रमाणपत्रे देणे ;

(ञ) मंडळाचे अधिकारी व कर्मचारी यांची मंडळाच्या कार्यालयात नेमणूक करणे व त्यांच्या सेवेच्या शर्ती ;

(ट) मंडळाच्या उक्त अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या हितासाठी भविष्यनिर्वाह निधी उभारणे ;

(ठ) मंडळाच्या सर्व आर्थिक बाबींचे नियंत्रण प्रशासन, अभिरक्षा व व्यवस्थापन ;

(ड) मंडळ ज्या दिनांकापूर्वी व ज्या रीतीने अर्थसकल्प तयार करील तो दिनांक व रीत ;

(ढ) मंडळाच्या सदस्यांना व त्यांनी नियुक्त केलेल्या समिती सदस्यांना मिळावयाचा भरपाई भत्ता ;

(ण) परीक्षा सुरळीत पार पाडण्यासाठी शासकीय व अनुदानप्राप्त तसेच विनाअनुदान संस्था किंवा तंत्रनिकेतने यांच्याकडील अधिकाऱ्यांची आणि कर्मचारीवर्गाची नेमणूक करणे ;

(त) या अधिनियमान्वये विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब ;

(३) या कलमान्वये तयार करण्यात आलेले विनियम, शासनाच्या मंजुरीशिवाय अंमलात येणार नाहीत.

पहिले विनियम.

**४७.** (१) कलम ४६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, पहिले विनियम हे, शासन तयार करील आणि मंडळाकडून नवीन विनियम रीतसर तयार करण्यात येईतोपर्यंत ते अंमलात राहील.

(२) जर शासनास कोणत्याही वेळी असे वाटेल की, कलम ४६ मध्ये निर्दिष्ट बाबींपैकी कोणत्याही बाबींच्या संबंधात कोणतेही नवीन विनियम करणे इष्ट आहे किंवा पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट किंवा कलम ४६ अन्वये मंडळाने केलेल्या कोणत्याही विनियमांमध्ये फेरबदल करणे किंवा ते पूर्णतः किंवा अंशतः निरसित करणे इष्ट आहे तर, शासनास, मंडळाशी विचारविनिमय केल्यानंतर, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असे विनियम करता येतील किंवा त्यात फेरबदल करता येतील किंवा असे विनियम एकतर पूर्णतः किंवा अंशतः निरसित करता येतील ; याप्रमाणे तयार केलेले, फेरबदल केलेले किंवा निरसित केलेले विनियम, शासन अशा अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करील अशा दिनांकापासून किंवा असा कोणताही दिनांक विनिर्दिष्ट केला नसेल तर, **राजपत्रातील** अशा अधिसूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून, अशा दिनांकापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या बाबतीत असेल ते खेरीजकरून, अंमलात येतील.

उप-विधी करण्याचा मंडळाचा अधिकार.

**४८.** मंडळास, पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधात तरतूद करण्यासाठी या अधिनियमाशी सुसंगत असे उप-विधी करता येतील :—

(क) मंडळाच्या आणि मंडळाने नेमलेल्या समित्यांच्या सभांमध्ये अनुसरावयाची कार्यपद्धती व अशा बैठकीमध्ये गणपूर्ती होण्यासाठी आवश्यक सदस्य संख्या ;

(ख) या अधिनियमाद्वारे किंवा या अधिनियमाखाली केलेल्या विनियमांद्वारे ज्याबाबत तरतूद केलेली नसेल अशी, केवळ मंडळाची आणि त्याच्या समित्यांशी संबंधित इतर कोणतीही बाब.

४९. हा अधिनियम किंवा तदन्वये केलेले कोणतेही विनियम किंवा उप-विधी यांच्या कोणत्याही तरतुदींच्या अर्थासंबंधी कोणताही प्रश्न उपस्थित झाल्यास, ती बाब निर्णयासाठी शासनाकडे निर्देशित करता येईल, आणि मंडळाच्या सदस्यांपैकी निदान तीन सदस्यांनी तशी मागणी केल्यास, ती बाब याप्रमाणे निर्णयासाठी शासनाकडे निर्देशित करण्यात येईल. शासनाचा निर्णय अंतिम असेल. शंका उपस्थित झाल्याच्या बाबतीत अर्थउकल.

५०. पदविका स्तरावरील सर्व संलग्न संस्था मंडळाच्या या अधिनियमाखालील कर्तव्याचे पालन करण्यासाठी आणि कार्ये पार पाडण्यासाठी, मंडळास आवश्यक अशी मदत व सहाय्य करतील. तंत्रनिकेतन व पदविका स्तरावरील संस्था यांची कर्तव्ये व त्यांचे सहाय्य.

५१. या अधिनियमानुसार अथवा कोणतेही विनिमय किंवा उप-विधि यानुसार सद्‌भावपूर्वक केलेल्या अथवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या अथवा करण्याचे हेतू असलेल्या कोणत्याही कृत्याबद्दल, शासन, [1][किंवा नियामक परिषद,] किंवा मंडळ किंवा सदस्य यांच्याविरूद्ध किंवा शासनाच्या [2][किंवा नियामक परिषदेच्या] अथवा मंडळाच्या कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरूद्ध कोणताही दावा,अभियोग अथवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. सद्‌भावपूर्वक केलेल्या कार्यवाहीस संरक्षण

५२. मंडळाचे सर्व सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी, जेव्हा या अधिनियमांतील तरतुदी नुसार कार्यवाही करतील किंवा तसे करण्याचे अभिप्रेत असेल तेव्हा, भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थानुसार त्यांना लोकसेवक समजण्यात येईल. मंडळाचे सदस्य, अधिकारी आणि कर्मचारी लोकसेवक असणे.

५३. (क) विद्यमान मंडळाची प्रत्येक समिती व्यवहार्य असेल तेथवर, परंतु नेमून दिलेल्या दिवसापासून सहा महिन्यांच्या कालावधीत या अधिनियमाच्या तरतुदींना अनुसरून पुनर्घटित करण्यात येईल. व्यावृत्ती

(ख) कोणत्याही व्यक्तीने नेमून दिलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी अध्यक्ष, सचिव, वित्त अधिकारी, लेखा अधिकारी, पद्धती विश्लेषक, परीक्षा नियंत्रक, सह-सचिव (तंत्र), उप-सचिव (तंत्र) व सहायक सचिव (तंत्र) म्हणून मंडळाचे पद धारण केले असल्यास, या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये शासनाने नियुक्त केलेला संबंधित अधिकारी त्याच्या पदावर हजर होईपर्यंत ती व्यक्ती उक्त पद धारण करण्याचे चालू ठेवील.

(ग) नेमून दिलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी, विद्यमान मंडळाशी सलग्न सर्व संस्था या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये त्यांची संलग्नता काढून घेतली जाईपर्यंत किंवा तिच्यासंबंधी फेरविचार होईपर्यंत मंडळाशी संलग्न असल्याचे मानले जाईल.

(घ) विद्यमान मंडळाच्या कोणत्याही विशेषाधिकारांच्या हक्कदार असणाऱ्या सर्व शैक्षणिक संस्था या मंडळाच्या या अधिनियमाखाली तत्सम विशेषाधिकारांचा हक्कदार असल्याचे मानले जाईल.

(ङ) विद्यमान मंडळाने स्वीकारलेली किंवा त्यांना मिळालेली आणि त्याने धारण केलेली धर्मदाने नेमून दिलेल्या दिवसाच्या लगतपूर्वी, मंडळाने या अधिनियमाखाली स्वीकारली

---

[1] सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम १७(क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १७ (ख) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

असल्याचे किंवा ती त्यास मिळाली असल्याचे किंवा त्याने धारण केली असल्याचे मानण्यात येईल, आणि ज्या शर्तीवर अशी धर्मदाने स्वीकारण्यात आली असतील किंवा मिळाली असतील किंवा धारण केली असतील त्या सर्व शर्ती, या अधिनियमातील कोणत्याही तरतुदींशी विसंगत असल्या तरीही, शक्यतो, या अधिनियमाखाली विधिग्राह्य असल्याचे मानण्यात येईल.

(च) नेमून दिलेल्या दिवसाच्या प्रारंभापूर्वी पत्करण्यात आलेली आणि विद्यमान मंडळाच्या नावे कायदेशीरपणे अस्तित्वात असलेली सर्व ऋणे, दायित्वे व आबंधने यांची फेड व पूर्तता मंडळ करील.

(छ) विद्यमान मंडळाच्या प्रीत्यर्थ कोणतेही मृत्यूपत्रितदान, दान, अटी किंवा विश्वस्त-व्यवस्था यांचा ज्यात समावेश आहे असे, नेमून दिलेल्या दिवसाच्या प्रारंभापूर्वी करण्यात आलेले कोणतेही मृत्यूपत्र विलेख किंवा इतर दस्तऐवज यांचा अर्थ, जणू त्यामध्ये या अधिनियमाच्या प्रारंभापासून विद्यमान मंडळाऐवजी मंडळाचे नाव दाखल करण्यात आले असावे त्याप्रमाणे लावण्यात येईल.

(ज) कोणत्याही अधिनियमितिमध्ये किंवा कोणत्याही अधिनियमितिअन्वये काढण्यात आलेल्या इतर संलेखांमध्ये, विद्यमान मंडळासंबंधी असलेले सर्व संदर्भ हे, या अधिनियमाखाली घटित केलेल्या मंडळाबाबतचे संदर्भ आहेत असा अन्वयार्थ लावण्यात येईल.

(झ) नेमून दिलेल्या दिवसांच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या आदेशान्वये वैध रीतीने केलेली परीक्षकांची नियुक्ती ही, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता त्याअन्वये स्थापन केलेल्या मंडळासाठी केलेली आहे, असे मानले जाईल. आणि असे परीक्षक हे, या अधिनियमाखाली, नवीन नियुक्त्या होईपर्यंत ती पदे धारण करतील व त्यांची कर्तव्ये व कार्ये पार पाडतील.

(ञ) विद्यमान मंडळाच्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना लागू असलेले सेवा विनियम या अधिनियमान्वये विहित केले असल्याचे मानले जाईल आणि या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद केली असेल त्या व्यतिरिक्त, या अधिनियमाच्या तरतुदीअन्वये त्यांचे अधिक्रमण केले जाईपर्यंत त्या तरतुदी पुढे अमंलात राहतील.

(ट) कोणत्याही प्राधिकाऱ्याद्वारे काढलेल्या किंवा जारी केलेल्या सर्व सूचना व आदेश आणि विद्यमान मंडळाचे आदेश व परिपत्रके, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसतील तेथवर, अंमलात असण्याचे चालू राहतील आणि ते या अधिनियमान्वये काढलेले किंवा जारी केलेले असल्याचे मानले जाईल.

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

**५४.** या अधिनियमाच्या तरतुदी लागू करण्यामध्ये कोणतीही अडचण उद्‌भवत असेल तर, शासन, आदेशाद्वारे प्रसंगानुसार परंतु, नेमून दिलेल्या दिवसापासून दोन वर्षांपेक्षा उशिराच्या नसलेल्या कालावधीत, या अधिनियमाच्या प्रयोजनाची उद्दीष्टे आणि हेतू यास विसंगत नसेल व अडचण निवारणाच्या प्रयोजनांकरिता करणे आवश्यक व इष्ट असेल, असे काहीही करू शकेल.

# अनुसूची

## प्रदेश

[कलम २ (ञ) पहा]

| प्रदेश | | क्षेत्र |
|---|---|---|
| १ | औरंगाबाद .. | अहमदनगर, औरंगाबाद, बीड, धुळे, जळगाव, जालना, लातूर, नांदेड, नाशिक, उस्मानाबाद आणि परभणी. |
| २ | नागपूर .. | अकोला, अमरावती, भंडारा, बुलढाणा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर, वर्धा आणि यवतमाळ. |
| ३ | पुणे .. | कोल्हापूर मुंबई, नवी मुंबई, पुणे, रायगड, रत्नागिरी, सांगली, सातारा, सिंधुदुर्ग, सोलापूर आणि ठाणे. |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई